कार्यालयीन टीपणी

दि.     /     /२०२२

मा.जिल्हा अभियान सहसंचालक, उमेद -महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अहमदनगर तथा प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. अहमदनगर यांचे मान्यतेस्तव.

विषय - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत जामखेड तालुक्यातील महिला स्वयंसहायता समूहांना खेळते भांडवल मंजुर करणे बाबत.

संदर्भ- १. शासन परिपत्रक क्रमांक – एमएसआरएलएम २०१७ प्र./ क्र./ २४९/ योजना ३ ग्रामविकास विभाग बांधकाम भवन, मईबान रोड मुंबई. दि.०७/१२/२०१७

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जामखेड यांचे पत्र. दिनांक २८/०२/२०२२

सविनय सादर,

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत अहमदनगर जिल्ह्यामध्ये १४ तालुक्यामध्ये अभियानाच्या Intensive कार्यपध्दतीने काम सुरु आहे. अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट हे गरीबांच्या गाव पातळीवरील लोक संस्थांचे बळकटीकरण करणे व त्या चिरस्थायी करणे आहे. गरीबातील गरीब कुटुंबांनी अधिकाधिक गुंतवणुक करुन स्वतःची उपजीवीका, रोजगार, उदयोग व्यवसाय सुरु करणेसाठी अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार अभियानाच्या अंतर्गत महिला स्वयंसहायता गटांची स्थापना झाल्यानंतर गटांचे ग्रेडेशन करून त्यांना खेळते भांडवल अदा करण्यात येते. वरील संदर्भ २ नुसार गटविकास अधिकारी, ता. जामखेड यांनी तालुक्यातील महिला स्वयंसहायता गटांचे खेळते भांडवलाचे प्रस्ताव या कार्यालयास सादर केले आहेत. आर्थिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये अहमदनगर जिल्हयाला ६२२९ गटांना खेळते भांडवल वितरीत करण्याचे उदिष्ट देण्यात आलेले आहेत. जामखेड तालुक्याला चे २२८ भौतिक उदिष्ट देण्यात आले असून त्यापैकी ५० स्वयंसहाय्यता गटांना खेळते भांडवल वितरीत केले आहे. वरील संदर्भ २ नुसार त्यांनी ६५ गटांचे खेळते भांडवल प्रस्ताव सादर केलेले असून सदरील गटांना खेळते भांडवल वितरीत करण्यासाठी प्रस्ताव लेखा शाखेकडुन तपासुन घेण्यात यावे असे वाटते.

सदरील गटांचे प्रस्ताव सोबत जोडण्यात आलेले आहेत. गटांची सविस्तर माहिती तक्ता १ मध्ये देण्यात आलेली आहे.

तक्ता १

| अ. क्र. | गावाचे नाव | गटाचे नाव | बँक शाखा | IFSC CODE | खाते क्र | RF रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | एकूण | |

वरील प्रमाणे गटविकास अधिकारी, ता.जामखेड यांनी प्रस्तावित केलेल्या ६५ गटांना खेळते भांडवल वितरीत करण्याचे प्रस्तावित आहे. वरील संदर्भ १ अन्वये रक्कम रुपये दहा लक्ष पर्यंत खेळते भांडवल वितरित करण्याचे वित्तीय अधिकार मा. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा जिल्हा अभियान सहसंचालक यांना आहेत. सदरील बाबींवर होणारा खर्च NRLM अंतर्गत B 3 1 1 या लेखाशिर्षातर्गत उपलब्ध निधीतून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. वरील प्रमाणे एकुण ६५ गटांना प्रती गट रक्कम रुपये १५,०००/- याप्रमाणे एकुण रक्कम रुपये **९,७५,०००/-** (अक्षरी – नऊ लाख पंच्याहत्तर हजार रुपये मात्र) चे देयक मंजुरीस्तव तथा स्वाक्षरीस्तव सविनय सादर.